# सूरज गाताडे

# डेथ विल



# डेथ विल

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

डेथ विल
सूरज काशिनाथ गाताडे
चिंगळे गल्ली, पेठ वडगांव
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
महाराष्ट्र 416112

mob.no – 9021584727

surajgatade26@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

## प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन : १जुलै २०१७



©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

# “डेथ विल”

(लेखक - सूरज काशिनाथ गाताडे)

नमस्कार वाचक मित्रा आणि मैत्रिणी

मी सूरज काशिनाथ गाताडे.

सहावीत असताना २००५ साली मी १२ वर्षांचा असताना मी लिहायला लागलो. लहानपणापासून अकबर - बिरबल, तेनाली रमण, पंचतंत्र, इसापनीती इ. गोष्टी, अनेक चित्रकथा वाचून, कार्टून्स् पाहून मला लिहिण्याची प्रेरणा मिळाली. आणि माझा लेखन प्रवास चालू झाला...

पण मी कधीच माझी कोणतीच कथा प्रकाशित नाही केली. मी स्वतःच्या समाधानासाठी लिहित होतो. एवढया मोठया प्रमाणात माझी कथा प्रकाशित करण्याची ही माझी पहिलीच वेळ...

दोन फिल्म् प्रोडक्शन्स हाऊसेस्साठी मी कंसेप्ट राईटर, व स्क्रीप्ट डॉक्टर म्हणून काम केले आहे. आत्ता मराठीत वेगवेगळे प्रयोग होत असले तरी सायन्स् फिक्शन, क्राईम फिक्शन, सस्पेन्स, थ्रिलर, ॲक्शन, इ. जन्राज् अजूनही हाताळले जात नाहीत म्हणून मला मराठीत अशा प्रकारचे नवनवीन व वेगवेगळे जन्राज् हाताळायचे आहेत व म्हणूनच स्वतः फिल्म् प्रोड्युसर होण्याची माझी इच्छा आहे. फायनान्स् प्रोब्लेम आहे; पण ईश्वर इच्छा असेल, तर हे स्वप्न नक्की पूर्ण होईल. नाही झालेच, तर निदान प्रयत्न केल्याचे समाधान गाठीशी राहिलच...

मला बिझिनेस बुक्स, आत्मचरित्रे, सस्पेन्स, थ्रिलर, क्राईम व सायन्स् फिक्शन जनरल्ज् वाचण्यास खूप आवडतात. तरी मी प्रत्येक प्रकारचं वाचन करतो.

संपर्क व पत्ता - चिंगळे गल्ली, पेठ वडगांव.
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर,
महाराष्ट्र - ४१६ ११२
मो. नं. ९०२१५८४७२७
ई. मेल - surajgatade26@gmail.com

# डेथ विल

## १. सूरज गाताडे तुम्हीच ना?

चहा संपवून सका-सकाळी एका कथेवर काम करत बसलो होतो. सुट्ट्या चालू असल्याने आई मामाकडे गेली होती. मला माझं काम असल्याने मी घरीच थांबलो होतो.

मस्त लिंक लागली असतानाच दारावर ठकठक झाली. वैतागून मी दार उघडले.

आणि... आणि... माझी वाचाच बसली. मी जागीच गोठून गेलो. पंखा चालू असताना घामाच्या धारा लागल्या... माझ्या समोर यमराज जो उभा होता...

“सूरज गाताडे तुम्हीच ना?” समोरच्या व्यक्तीने विचारले.

मी काहीच रिॲक्शन देवू शकलो नाही.

“काय विचारतोय मी? सूरज गाताडे तुम्हीच ना?” त्याने आवाज चढवून पुन्हा विचारले.

“अं?! ह... हो... हो...” आपसूक माझ्या तोंडून निघालं.

“मी विजय वाघ!” तो स्मित करत म्हणाला.

मी अजूनच गारठलो. मला खूप जोरात भिती वाटू लागली...

“ओळखलं नाही?! अहो माझं बारसं तुम्हीच तर केलंय...” तो हसून म्हणाला.

“ॲम सॉरी... ॲम रिअली वेरी सॉरी... प... पुन्हा असं होणार नाही...”

तो शेवटची पायरी चढून पुढे आला आणि मला आत ओढू लागला.

“या हो. आपलंच घर समजा.” माझ्याच घरात शिरत मला आत ओढत तो मलाच असं म्हणत होता...

आम्ही सोफ्यापाशी आलो.

"बसा." मला म्हणाला.

मी काही शब्द न काढता गप्प सोफ्यावर बसलो. पुढं काय होणार याचा मी मनातल्या मनात अंदाज बांधत होतो. पण हे सगळं कल्पनेपलिकडचे होते. कदाचित आज मी जीवंत राहणार नव्हतो...

तो माझ्यासमोर बसला आणि पॅंटेत खोवलेली त्याची गन काढून त्याने माझ्यासमोर टी-पॉयवर ठेवली. ते पाहून मला अजूनच घाम फुटला. घसा सुखायला लागला होता माझा...

"बसल्यावर टोचते ओ..." हसून तो म्हणाला.

पण त्याच्या या विनोदावर मला अजिबतच हसू आले नाही. कसे येणार होते... समोर तो बसला होता...

"काय? भिती वाटते?" त्याने विचारले.

मी काहीच बोललो नाही. त्याच्याशी नजर चोरत होतो.

"मग मिस्टर सूरज... मास्टर आय गेस्. तुम्ही अशी कामं करताच कशाला ज्यानं भिती वाटेल?"

त्याची नजर माझ्या रिकाम्या चहाच्या कपावर पडली. त्याने तो तिरका करून बघितला.

"चहा झालाय वाटतं? पण पाहुण्याला विचाराल की नाही; चहा! तुम्हाला भेटायचं म्हणून न घेताच आलोय. बिझी माणसं ना तुम्ही. कधी कुणाच्या मागावर जाल आणि त्याची माहिती काढाल, सांगता येत नाही!"

"स... सॉरी..."

"सॉरीच्या पुढं जरा सरका."

"मी... मी चहा करून आणतो." मी उठू लागलो.

"अंहं! सीट!" जरा कठोरपणेच त्याने मला बसण्यास सांगितले.

"मी तुम्हाला बोलण्यात पुढं सरकायला सांगितलं. इथून नाही."

आणि पुन्हा त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. त्यानं मंद स्मित केलं,

"मी करतो. तुम्ही घेणार?"

“न... नाही. झालाय माझा...”

‘कुणी सांगावं? चहात विष घालून यानं मारलं तर? याचं विष डॉक्टर्सना डिटेक्टही होणार नाही...’

“घाबरू नका! चहात विष नाही घालणार!” माझ्या मनातलं त्याला ऐकू गेल्यासारखं तो बोलला व पुन्हा हसला.

“इकडंच ना?” असं विचारून तो किचनच्या दिशेने चालू लागला. थांबला.

“पळून जायचं नाही!” असं सांगून किचनमध्ये शिरला.

इकडे माझी अवस्था खूपच बेकार झाली आहे. माझी नजर टी - पॉयवरील त्या गनवर होती. त्यातून कधी गोळी सुटेल आणि कधी ती माझी कवटी छेदेल; काही सांगता येत नव्हते.

‘पळून जावं का?’ असा विचार एका एका क्षणाला हजार हजारदा माझ्या मनात येत होता...

‘पण नाही नको.’

कारण मला ठाऊक होतं, की मी कुठं जरी पळून गेलो, लपलो, तरी हा कुठूनही मला शोधून काढणारच...! मला आहे तिथे गप बसण्याशिवाय काही पर्यायच नव्हता...

माझी नजर त्या बंदुकीवर स्थीर होती. मी इतका वेळ पापणीही लवली नव्हती. चहाचा कप घेवून तो बाहेर आला.

“पॉईन्ट फोर्टी फोर मॅग्नम. माझी सर्वात आवडती. पण याच्या पेक्षाही मला .३२ कोल्ट जास्त आवडते. दाखवीन मी नंतर.”

‘दाखवीन? म्हणजे हा मला त्याच गनने मरणार बहुतेक...’

तो पुन्हा माझ्यासमोर येवून बसला.

“कालची तुमची ‘द रॉयल ईगल’ वाचली.” चहाचा घोट घेत तो म्हणाला.

“ॲम सॉरी सर... पुन्हा खरंच असं होणार नाही...” मी जवळ जवळ रडकुंडीलाच आलो होतो.

वास्तविक 'द रॉयल ईगल' ही एक माझी लघू कथा. जी मी एका न्यूजपेपरमध्ये छापून आणली होती. ती कथा जरी असली, तरी ती काल्पनिक नव्हती.

ती, माझ्यासमोर बसलेल्या या माणसाची खरी कहाणी होती. याने पोलिसांच्या समोरच एका व्यक्तीचा खून केला होता. पण ते पोलिसांच्याही लक्षात आले नव्हते. पोलीसांना वाटत होते, की हा त्यांची मदत करत आहे. मला हे कळाले, कारण मी त्यानंतर त्याच्या मागावर होतो. आणि हाच माझा मूर्खपणा मला नडला होता...

हा स्वतःला एक डिटेक्टिव्ह जरी म्हणत असला, तरी याला एका गुन्हेगाराच्या गुन्हयाची खात्री झाली की हा स्वतःच त्या गुन्हेगाराला शिक्षा करतो.

शिक्षा... ती ही थेट सजाए मौत!!!

तीही अशी की त्याने एखाद्याला मारले; तर ते कसे मारले याचा साधा पुरावाही सापडत नाही...

सॉरी! आय कान्ट टेल यू सो मच अबाऊट हिम. ॲक्चुअली आयईव् ऑलरेडी टॉक्ड् टू मच... पण एक सांगतो, ही इज टू डेंजरस... लाईक ए क्रिमिनल... बट; ही इज नॉट ए क्रिमिनल! कंन्फ्युजिंग. राईट?!

त्यावेळी माझ्या दृष्टीने त्याचे ते कृत्य एक गुन्हेगाराचचं. वाटलं याच्या विषयी बातमीच छापावी. लोकांना कळावं तरी. म्हणून त्याचा पाठलाग मी करून त्याच्या विषयी सगळी माहिती काढली. ते प्रकरण नीट समजून घेतले. पण म्हंटले; याच्या विषयी डिरेक्ट लिहिले तर हा मला जीवंत सोडणार नाही. म्हणून त्याची कथा तयार करून मी ओळखीच्या असलेल्या त्या वृत्तपत्रात छापली होती. ही घटना लोकांसमोर यावी अशी माझी इच्छा तर होती, पण मला त्याचं नांव घ्यायचं नव्हतं. माझ्या कथेतून काही क्लू घेवून पोलिस काही ॲक्शन घेतली हा माझा अंदाज...

पण तो फोल ठरला होता आणि आता हा माझ्या समोर बसला होता...

"काय विचार करताय?" त्याने विचारले.

"क... क... काही नाही..." मी घाबरतच उत्तर दिले.

त्याने चहाचा घोट घेतच स्मित केलं,

"डोन्ट वरी. आय ॲप्रिशिएट इट."

'माझे कान वाजतायत का? हा माझं कौतुक करतोय...'

"तुम्ही बरोबर ऐकलंयत." माझ्या चेहऱ्यावरील अविश्वास त्यानं वाचला होता. तो पुढे म्हणाला,

"यु कॅन कंन्टिन्यु. ॲज लोन्ग ॲज नो वन नोज् अबाऊट मी. आणि एक, माझं खरं नांव, कोणालाही कळता कामा नये! कळालं, तर तुम्हाला माहितच आहे, काय होवू शकतं ते. हो ना?! मी तुम्हाला चालू ठेवण्याची परवाणगी देतोय, कारण लोकांना कळावं; देअर इज् अ मॅन हु हॅज गटस् टु पनीश देम् इफ देइल मेक अ क्राईम!"

हे बोलत असताना त्याच्या डोळयांत विलक्षण चमक होती. त्यामुळं मी अधिकच घाबरलो. पण त्याने मला अभय दिले होते. म्हणून मी बळ एकवटून त्याला प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला,

"ए... एक विचारू?" मी बोललो.

"हं." संमती देत पुन्हा त्यानं चहाचा घोट घेतला.

"तुम्ही गन इथं सोडून गेलात... तुम्हाला भिती नाही वाटली... म्हणजे मी..."

मी वाक्य पुर्ण करू शकलो नाही. कसं करणार होतो... पण इतकं ऐकूनही तो काय समजायचं ते समजला. आणि मोठयाने हसला.

"सामान्य माणूस गन बघूनच घाबरतो. गनला हात लावण्याची हिंमत नाही करत!"

त्याने चहा संपवला.

"या कधी तरी घरी. पत्ता सांगण्याची गरज नाहीच." पुन्हा त्याने स्मित केले.

"सॉरी." मी संकोचून बोललो.

"ऑल राईट!" तो पुन्हा हसला.

आणि चहा संपवून तो निघून गेला. मी सुटकेचा निःश्वास सोडला. खूप मोठया संकटातून माझी सुटका झाली होती...

त्याच्याच परवाणगीने आता मी तुम्हाला त्याची एक गोष्ट सांगणार आहे. सॉरी या पूर्वीची 'द रॉयल ईगल' मी तुमच्या समोर नाही आणू शकत. कारण त्यामध्ये मी त्याचे खूप डिटेलींग केले आहे. त्यामुळं ती कथा पुन्हा पब्लिश करण्याची त्याची इच्छा नाही.

मी सांगत असलेली घटना जरी मोठी व गुंतागुंतीची असली, तरी माफ करा मी ती सविस्तर मांडू शकणार नाही. त्यामुळे कथा थोडी लहानच असणार आहे.

शिवाय मी त्याचे नांव, त्याची पार्श्वभूमी, त्याची आयडेंटीटी, त्याचे शिक्षण, तो राहतो कुठे, इ. आणि असलं बरंच काही सांगू शकणार नाही.

पात्र, स्थळांची नांवही बदलली आहेत. डिटेलींगही खूप कमी असेल, आशा आहे, तुम्ही समजून घ्याल आणि या कथेचा आनंद घ्याल...

## २.   द रॉयल ईगल

'द रॉयल ईगल' बद्दल काही सांगण्याची मला परवानगी नसली, तरी त्याची माझी भेट कशामुळे झाली हे सांगण्यासाठी मला त्यातील काही भाग सांगण्याची गरज वाटते म्हणून त्याच्या परवानगी शिवाय मी हे धाडस करत आहे...

तर; मि. वाघला मी पहिल्यांदा पाहिलं, ते एप्रिलच्या एका रात्री. २६ एप्रिल, माझ्या एका मित्राचा वाढदिवस होता. त्याचा वाढदिवस करून मी रात्री घरी परतत होतो. बाराच्या वर होवून गेले होते. संपूर्ण रस्ता रिकामा. माझी एकटयाचीच गाडी धावत होती. माझ्या बाईकचा आवाज त्या रात्रीच्या आवाजात घुमत होता.

लांबून काही व्यक्ती एका व्यक्तीचा पाठलाग करत असल्याचं मला दिसलं. त्यांचे एकमेकांवर फायरींगही चालू होते. मी घाबरलो. गडबडीने गाडी लावून मी एका सुरक्षित अशा एका कंपाऊंडच्या मागे उडी मारून भिंती मागे लपून बसलो. तिथून मला समोर घडणारा प्रकार पण दिसत होता. आणि जे काही मी पाहत होतो, ते विलक्षण होतं...

रात्रीची वेळ, विजय वाघ, एक इन्स्पेक्टर व दोन हवालदार एका व्यक्तीचा पाठलाग करत होते. वाघने त्याच्या कडील '.४५ लोन्ग कोल्ट' ने त्या व्यक्तीवर फायर केले.

(नंतरच्या भेटीत त्याने मला त्याची ही आणखी एक गन फेवरेट असणारी गन पण दाखवली.)

मी घाबरून आधी माझा मोबाईल स्वीच ऑफ केला. मध्येच तो वाजला असता आणि याला मी सापडलो असतो तर माझी ही खैर नव्हती...

पुढे ती व्यक्ती एका गाडीमागे लपून बसली आणि वाघवर फायर करू लागली. वाघही एका गाडीमागे लपला.

थोडावेळ विचार करून त्याने आपला कोट काढून त्या व्यक्तीच्या दिशेने फेकला.

(हो एप्रिलच्या कडक उकाड्यातही तो कोट घालून होता. मी एकदा त्याला याबद्दल विचारले होते. यावर त्याचे उत्तर खूप भारी होतं. तो मला म्हणाला,

"बिकॉज ॲम सो कुल! डोन्ट यू थिंक?" आणि त्यानं स्मित केलं.

मी ही हसून होकारार्थी मान हलवली. वास्तविक त्याला रिच जगायला आवडते).

वाघने कोट फेकताच हडबडीत त्या कोटाला वाघ समजून त्या व्यक्तीने त्याची सारी गन कोटावर रिकामी केली. छिद्रे पडलेला कोट खाली पडला. वातावरणात जेवढया जलद गोंगाट पसरला तेवढयाच लवकर शांतताही झाली.

काही सेकंदाने बुटांचा आवाज ऐकू येवू लागला. मघासच्या गोळीबाराने मी भितीने भिंतीमागे लपलो होतो. डोळे गच्च मिटून घेतले होते. पण या आवाजाने पुढे काय होतेय हे पाहण्याची माझी उत्सुकता चाळवली आणि मी पुन्हा हिंमत करून वर पुढे काय होतंय ते पाहू लागलो.

ती व्यक्ती घाबरलेली व घामाने डबडबलेली होती. वाघ त्याच्या दिशेने चालत होता. तो त्या व्यक्तीच्या समोर जावून उभारला. ती व्यक्ती पळण्याचा प्रयत्न करू लागली. वाघने त्याच्या मागे न पळताच जाग्यावरूनच फायर करून त्या व्यक्तीला खाली पाडलं. ती पडल्याचा जोराचा आवाज झाला.

वाघ एकदम निवांत त्या व्यक्तीकडे चालत गेला. वाघ त्याच्या दिशेने येत असताना त्याच्या चेहऱ्यावर काही वेगळंच स्मित तरारत होतं. त्याच्या डोळयांही एक विलक्षण चमक दिसत होती; त्या अंधारात सुद्धा. किती क्रूर भासत होता तो ते मी शब्दांत वर्णनही नाही करू शकत...

तो त्या व्यक्तीकडं असा चालून येत होता, जणू एखादा वाघ आपल्या शिकारीकडं येतोय. आता पर्यंत मागे राहिलेले पोलीसही पळत तेथे आले.

"हे काय केलं? तो का पळतोय हे सुद्धा आपल्याला क्लीअर झालेलं नाही..." इन्स्पेक्टर वैतागाने त्याला म्हणाले.

"डोन्ट वरी इन्स्पेक्टर! फक्त इंज्युअर्ड आहे. इन्स्पेक्टर, अरेस्ट हिम. हिअर इज युअर क्रिमिनल!" वाघ शांतपणे स्मित करत म्हणाला.

त्याने त्या व्यक्तीच्या पायांत पोटरीवर गोळी मारली होती. तो पळून तरी कसा जाणार होता म्हणून निपचित पडला होता.

“बट हाऊ?” इन्स्पेक्टरनी विचारले.

वाघ स्पष्टिकरण करू लागला,

“द रॉयल ईगल! खूनी वापरत असलेला ब्रॅन्ड! याच्या खिशात आहे. ॲन्ड आय अशुअर्ड यु; मृत अहमद शेख यांच्या घरातीलच नव्हे, तर ओळखीच्या व्यक्तींपैकी हाच एक असा आहे जो हा ब्रॅन्ड वापरतो.”

“खूनी द रॉयल ईगलची सिगारेट वापरतो हे तुम्हाला कसं कळलं?” इन्स्पेक्टर गोंधळले होते.

“डेडबॉडीपाशी जी ओढलेली सिगारेट पडली होती, त्याच्या फिल्टरवर फ्लाईंग ईगलचे चित्र होते. हा व्यक्ती जेव्हा शेख यांच्या घरी त्यांच्या कुटूंबियांचं सांत्वन करण्यासाठी आला होता, त्यावेळी त्याने ओढत असलेली सिगारेट बाहेरच फेकून दिली होती. त्यावेळी मी सर्वांचं निरिक्षण करण्यासाठी बाहेरच थांबलो होतो. नाऊ ही इज ऑल युअर्स!

“थॅन्क्स् मि. वाघ!” इन्स्पेक्टरनी वाघचे आभार मानले.

“इटस् माय प्लेजर!”

त्या व्यक्तीला पोलिस वॅनकडे नेण्यात आले. वाघने त्या व्यक्तीची मलमपट्टी केली.

मी कंफ्युज झालो. यानेच गोळी मारली आणि हाच का मलमपट्टी करतोय?

(नंतर मला याचे उत्तर मिळाले.)

इन्स्पेक्टरने वाघचा निरोप घेतला. पोलिस वॅन निघून गेली. नंतर वाघ रस्त्यावर काही तरी शोधू लागला. पाच - दहा मिनिटांच्या शोधानंतर त्याला ते मिळाले जे तो शोधत होता. ते होते त्याच्या बंदूकीची गोळी आणि त्या गोळीचे काडतूस.

या घटनेचं ठिकाण त्याच्या राहत्या घरापासून दीड - दोन कि. मी.वर असेल, तरी तो पळतच घरी निघून गेला.

मला व्यायामाची सवय नाही. पण मला पळत त्याचा पाठलाग करण्याची गरज वाटली. म्हणून मला त्याच्या मागे पळण्याशिवाय पर्याय नव्हता. माझ्या गाडीच्या आवाजाने तो सावध झाला असता.

त्याच्या मागे मला लपत छपत पळणं भाग होतं. त्यामुळं मला श्वास घ्यायला थोडा तरी वेळ मिळत होता. पण तो कुठं तरी मिस होईल म्हणून माझी गडबड पण होत होती.

फायनली त्याचं घर आलंच. तो घरात शिरला व दार लावून घेतलं.

मी बाहेरच थांबलो. त्याच्या घराची चहूबाजूंनी फिरून मी पाहणी केली. आणि परत गाडीकडे आलो.

त्या रात्री घरी यायला मला तीन वाजले. आई खूप काळजीत होती. तिचा ओरडा खावून मी झोपयला गेलो. पण झोप लागेना. ते सगळं डोळयांसमोर फिरत होतं. वाघवर मी प्रभावित झालो होतो. हे कॅरेक्टर आपण आपल्या कथेसाठी वापरू शकतो असं मला वाटलं, म्हणून मी पुन्हा त्याच्या मागावर जायचं ठरवलं.

खरं तर हे जोखमीचंच होतं.

तरी दूसऱ्या दिवशी मी सकाळीच त्याचं घर गाठलं. तो अजून बाहेर आला नव्हता. मी पुन्हा त्याचं घर फिरून पाहिलं. एक खिडकी मला उघडी दिसली. खिडकीला जाळी असल्यानं आतलं स्पष्ट दिसत नव्हतं, पण माझ्या समोर तोच बसलाय हे मी ओळखलं. सुट बूट घालून तो चहा घेत पेपर वाचत बसला होता.

बाजूलाच असलेला त्याचा लॅंडलाईन वाजला. त्यानं फोनचा स्पीकर ऑन केला.

“बोला इन्स्पेक्टर.”

“काय बोलू? काल आपण पकडलेला आरोपी मेला. पोस्टमर्टममध्ये त्याच्या शरीरात न्युरोटॉक्सिक विष सापडलंय. पण ते त्याच्या शरीरात गेलं कसं काही कळायला मार्ग नाही. साप चावल्याचीही कोणती खूण नाही सापडली. तो रात्रभर

आमच्या कस्टडीतच तर होता. तेथे साप येईलच कसा? कोणताही साप आमच्या पोलीस स्टेशनमध्ये येणं शक्य नाही ओ."

"च्च्. वाईट झालं. पण आता आपण करू काय शकतो? देवानेच त्याला शिक्षा केली म्हणायची आणि काय?"

"होय. बरं चला. भाय. हेच सांगायला फोन केला होता."

"बरं बाय." त्याने फोन कट केला आणि मोठयाने हसू लागला.

"तुम्हाला साप घावणारही नाही इन्स्पेक्टर! कारण त्याला वाघ नावांचा साप चावलाय!" तो स्वतःशीच मोठयाने म्हणाला.

'याला म्हनायचाय तरी काय?' असा प्रश्न माझ्या मनात डोकावला.

पण लगेचच मला त्याचं उत्तरही मिळालं. तो जागावरून उठला आणि समोरच्या टेबलापाशी चालत गेला. बाजूलाच पडलेली एक मोठी लाकडी पेटी त्याने उघडली आणि त्यातून त्याने ठसठशीत काळा असा भला मोठा साप बाहेर काढला. नंतर मला समजलं, की तो मण्यार होता.

माझा श्वासच अटकला. तोंडातून आवाज निघू नये आणि होत असलेला श्वासोच्छ्वासाचा आवाज त्याला ऐकू जावू नये म्हणून मी तोंड आणि नाकही दोन्ही हाताने दाबून धरले. आणि श्वासावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करू लागलो. अनुभवावरून मी समजलो होतो, की त्याच्या डोक्या - डोळयांसोबतच कानही तीक्ष्ण आहेत.

त्याने त्या सापाचे विष प्लॅस्टिक पिशवी लावलेल्या एका भल्यामोठया काचेच्या बरणीत काढले. त्या बरणीत बऱ्याच बंदूकीच्या गोळया होत्या.

माझी हालत पाकच खराब झाली. मी तेथून पळ काढला. मला अजून आठवत नाही की माझ्या बाईकचा वेग त्यावेळी काय होता... मला बस त्यावेळी तेथून पळून जायचं होतं.

कुठे तरी मला जाणवत होतं, फोनचा स्पीकर ऑन करणं, आपल्या कृत्य मोठयानं कबूल करणं, सापाचं विष काढणं... या गोष्टींची त्यावेळी काही गरज नव्हती. त्यानं मुद्दाम हे केलं होतं. त्याला मी तेथे असल्याची जाणीव झाली होती... प्राण मुठीत घेवून मी पळालो तेथून...

गाडी चालवत असताना डोक्यात ती कालची घटना वाजत होती... मी समजलो,

'त्या व्यक्तीच्या शरीरात विष कोठून गेले ते. त्याने त्या व्यक्तीवर चालवलेली गोळी याच विषात बुडवलेली होती. झालेल्या जखमेतूनच ते विष त्या व्यक्तीच्या शरीरात गेले असणार. त्याने जखम याचसाठी धुवून मलमपट्टी केली असणार, ज्यामुळे तो पकडला जावू नये.

'हा... म्हणूनच तर त्याने गोळी व काडतूस काल शोधलं... कारण पोलिसांना संशय आला असता, तर ते नक्कीच गोळीचा शोध घेण्यासाठी त्या स्पॉटवर गेले असते...

"काय माणूस आहे हा? इतकं क्रूर कोणी कसं असू शकतं?" मी विचारांच्या गर्देत मी मोठयानं बोलून गेलो होतो.

दोन दिवस मी घरातून बाहेरच नाही पडलो. वाघचीही मला शोधण्यासाठी काही हालचाल चालू आहे असं मला दिसत नव्हतं.

म्हणून मग मी त्याच्या विषयी छापायचं ठरवलं. पण आता कोणतीही रिस्क घ्यायची नव्हती. म्हणून मी त्या घटनेला एका गोष्टीचे रूप देवून छापली...

असं करून सुद्धा परिणाम माझ्या समोर आलाच. त्यानं मला ओळखलं आणि तो घरी येवून गेला... बरं तर बरं, घरी कोणी नव्हतं. मी एकटाच होतो...

पण आता मला त्याच्या कारनामांच्या गोष्टी छापण्याची परवानगी खुद्द त्याच्याकडूनच मिळाली आहे. म्हणून मी त्याच दिवशी त्याच्या घरी गेलो. ज्यादिवशी तो माझ्या घरी आला होता...

## ३. मिस्टर वाघचे घर

पहिल्यांदाच त्याचं घर मी आतून पाहत होतो

(माफ करा मी घराचं वर्णन नाही करू शकत).

त्यानं हसून माझं स्वागत केलं. मला बसायला सांगून तो माझ्यासाठी चहा करायला आत गेला.

माझी नजर मात्र बाजूच्या पेटीवर हाती. अत्यंत घाबरत त्या पेटीकडं पाहत होतो मी.

वाघ चहा घेवून बाहेर आला.

“घाबरू नका. तो उडी मारून बाहेर नाही येत.” तो हसत म्हणाला.

मी नजर फिरवून त्याच्याकडं पाहिलं. त्यानं मला चहा दिला. मी पिऊ लागलो. पण आपला चहा न घेता तो त्या टेबलापाशी गेला. माझी तंतरली.

‘मी का आलो इथं’ असा प्रश्न त्यावेळे शेकडोवेळा स्वतःला विचारला असेन मी...

त्याने ड्रॉव्हरमधून एक गन काढली. मी कपबशी तशीच टाकून पळून जाण्याच्या तयारीत होतो. हे त्याच्या लक्षात आले. तो मोठयाने हसला.

“निवांत बसा.”

तो माझ्या समोर येवून बसला,

“मी सकाळी बोललेलो ती ही गन, कोल्ट १९११. फर्स्ट एडिशन. पॉईंट फोर्टी फाईव. नाईन एम एम पेक्षा खतरनाक. तुमच्या रॉयल ईगलवाल्याला मी यानंच मारलंय.”

तो काय बोलत होता ते अक्षरशः माझ्या डोक्यावरून जात होते.

आणि त्याचवेळी त्याने मला आणखी एक गन स्वतःजवळून काढून दाखवली.

"बेरेट्टा नाईन्टी सिक्स! नवीन हाती लागली. मॅग्नम व कोल्टस् या माझ्या स्वतःच्या आहेत. पण बेरेट्टा माझ्या क्लायन्ट कडून मिळाली आहे. ही मला आवडली कारण याचा रिकॉईल टाईम खूप कमी आहे. आणि यात नाईन एम एम व टेन एम एम गोळीही बसते."

"गिफ्ट दिली?" मी घाबरत विचारलं.

माझ्या या प्रश्नावर तो मोठयाने हसला. म्हणाला,

"गिफ्ट? नाही. मी त्याला मारून घेतलीए..."

त्याचे हे वाक्य ऐकून मी अक्षरशः जागीच फ्रिझ झालो...

आणि तो मला त्या क्लायन्टची गोष्ट सांगू लागला...

(त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील घटना बऱ्यापैकी या पुढील घटनेशी थोडी फार साधर्म्य ठेवणारी आहे. म्हणूनच त्याने सगळयांत पहिली ही घटना निवडली मला सांगण्यासाठी...)

ती मी माझ्या शब्दांत सांगत आहे...

## ४. खूनी मृत्यूपत्र...

मी वाघला त्याच्या घरी भेटायला जाण्याच्या चार महिन्यांपूर्वी एक २५ वर्षांचा सुदृढ असा तरूण वाघला भेटायला आला होता.

"तुम्हीच मिस्टर विजय वाघ का?" त्याने विचारले.

"आय गेस सो!" वाघने त्याच्या मिश्किल स्वभावानुसार त्याला उत्तर दिले.

"मी..."

त्याने स्वतःची ओळख करून देण्याआधीच वाघ बोलला,

"तुम्ही गायकवाडांच्या घरातील आहात! तुमची मोठी टेक्सटाईल इन्डस्ट्री आहे."

"स्ट्रेन्ज! तुम्ही कसं ओळखलं? आपण या आधी कधीच भेटलो नाही." त्या तरूणाने आश्चर्य व्यक्त केलं.

"तुमच्या कपड्यांच्या टेक्शचरवरून. या टेक्शचरचे कपडे तुमच्याच मिलमध्ये तयार होतात. फक्त तुमच्या घरातील व्यक्तींसाठीच." वाघ शांतपणे उत्तरला.

वाघच्या उत्तराने तो वाघवर खूपच प्रभावित झाला. त्याला त्या तरूणापासून दूर बसूनही त्याचे कपडे कोणत्या टेक्शचरचे आहेत हे समजले होते. यावरूनच वाघची नजर किती तीक्ष्ण आहे हे याची त्याला प्रचिती आली होती.

"आह! एकदम बरोबर. पण तुम्हाला आमच्या घराबद्दल एवढी डिटेल्ड् माहिती कशी?" त्याने वाघला विचारले.

वाघने स्मित केले,

"तुम्ही नीट पाहिलेत, तर तुमच्या लक्षात येईल, मी घातलेले सूटचे कापडही तुमच्याच मिलमध्ये तयार झाले आहे. युअर कंपनी हॅव ग्रेट क्वॉलिटी ऑफ क्लोथ्स्."

"थॅन्क्स!" रणजीतने हसून वाघला धन्यवाद दिले.

“बट आय गेस, तुम्ही इथं माझ्याकडून प्रशंसा करून घ्यायला नक्कीच आलेले नाही आहात. काम बोला!”

“हो नक्कीच. माफ करा. मी रणजीत धनाजीराव गायकवाड. आत्ताच्या तुमच्या बुद्धीकौशल्यावरून मला विश्वास वाटतोय, की तुम्ही माझे काम नक्की करू शकाल.

माझे अजोबा वीरसिंह श्रीपती गायकवाड हे ८ वर्षांपूर्वी गायब झाले. घरातले म्हणतात, की त्यांनी संन्यास घेण्याच्या इच्छेनं घर त्यागलं. पण २ वर्षांपूर्वी वाराणसीवरून घरच्या पत्त्यावर एक पत्र आलं. त्यात आजोबा वारले असल्याचं लिहिलं होतं. ही बातमी आमच्या खाजगी वकिलांना समजली. तेव्हा ते अजोबांनी घर सोडून जाण्यापूर्वी बनवलेलं मृत्यूपत्र घेवून घरी आले. कदाचित अजोबांना घरातील कोणावरच विश्वास नसावा म्हणून अजोबांनी त्यांची सर्व संपत्ती माझ्या नांवावर केली. पण त्यात अट अशी होती, की मी २५ वर्षांचा झाल्याशिवाय ही संपत्ती मला मिळणार नव्हती. चार दिवसांपूर्वीच मी २५ व्या वर्षात पदार्पण केलंय. आणि तेव्हापासून माझ्यावर दोनदा हल्ला झाला आहे.

तर माझी आता तुम्हाला अशी विनंती आहे, की तुम्ही त्या हल्लेखोराला शोधून काढावं आणि तो सापडेपर्यंत तुम्ही माझ्याकडेच येवून रहावं. प्लीज मी विनंती करतो...” शेवटचं वाक्य रणजीत खूपच कळवळीने म्हणाला.

“काय मी ते वाराणसीहून आलेलं पत्र पाहू शकतो?”वाघने त्याला विचारले.

“हो.”

आणि रणजीतने त्याला ते पत्र दाखवले. वाघने ते पत्र नीट काळजीपुर्वक पाहिले. पण त्याने काही प्रतिक्रिया दिली नाही. फक्त एक कटाक्ष रणजीतवर टाकला.

“तुम्ही प्लीज घरी चलावं.” रणजीत पुन्हा कळवळीने म्हणाला.

“ठिक आहे.” वाघने संमती दर्शवली.

## ५. गायकवाडांचे निवासस्थान

रणजीत वाघला घरी घेवून आला. रणजीतने वाघची व घरातील सर्वांची ओळख करून दिली. पण वाघ हा रणजीतचा गार्डियन बणून घरी आला आहे हे न लक्षात आणून देता, तो रणजीतचा एक मित्र असून काही कामानिमित्त इकडं आला असल्याचे सांगून तो काम होईपर्यंत त्याच्यासोबतच राहणार असल्याचे रणजीतने घरातल्यांना सांगितले.

रणजीतची काकी सुमन तीन वर्षांपूर्वी वारलेल्या होत्या. बाकी सगळे आपापल्या कामात व्यग्र. त्यामुळे वाघच्या असण्याने त्यांना तसा काहीच फरक पडणार नव्हता. त्यामुळे रणजीतने वाघला घरी नेले याचे कोणाला त्याचं काहीही वाटले नव्हते. घरही तसे प्रशस्त होते जणू एखादा राजवाडाच. म्हणून वाघचे तेथे स्वागतच झाले.

त्यामुळे वाघ स्वतःची खरी ओळख लपवून एक क्राईम थ्रिलर राईटर म्हणून, रणजीतचा मित्र संम्राट म्हणून तेथे राहू लागला. पण तो सर्वांवर बारीक लक्ष ठेवून होता.

रणजीतलाही न सांगता तो घरातील सर्वांच्या खोल्या चेक करत होता. प्रत्येकच्या खोलीत जावून प्रत्येकाशी संवाद साधायचा. त्याकारणाने प्रत्यकाची खोली नजरेनेच टिपून घ्यायचा. अशा प्रकारे त्याचे काम चालू होते...

## ६. काकांचा खून

काही दिवसांनी रात्री; ऋतुजा रणजीतची चुलत बहिण आजारी श्यामरावांची औषधे आणण्यासाठी बाहेर गेलेली होती.

“पप्पांची काही औषधे मेडिकलवाल्याकडे नव्हती. म्हणून तो दूसऱ्या मेडिकलमधून आणून घरपोच करतो म्हणालाय. नंतर एक मुलगा येईल औषधे घेवून. त्याला पप्पांच्या खोलीत जावू दे.” तिने एका नोकराला सांगितले.

घरातील सर्व एकत्र डायनिंगला जेवायला बसलेले असताना रणजीतचे काका श्यामराव मात्र त्यांच्या खोलीत होते. त्यांना बरे वाटत नव्हते म्हणून रात्रीचे जेवण सर्व कुटूंबाने एकत्रच घ्यावे असा घराचा नियम असूनही त्यांनी आपल्या खोलीतच जेवण मागवून घेतले होते.

अचानकच लाईटस् गेले. अंधारात वरील खोलीतून श्यामरावांचा ओरडण्याचा आवाज आला. वाघ रणजीतला घेवून खोलीकडे धावला. वरून कोणी आकृती खाली पळत येत होती. वाघ त्या आकृतीला पकडण्यासाठी पुढे धावला पण रणजीत ने त्याला अडवले,

“थांबा तुम्ही नका जावू. आपल्याला काकांना पहायला हवं.” व त्याने नोकरांना हाक दिली,

“नंदन, विनोद! बाहेर कोणी तरी पळत गेलंय. कोण आहे बघा. पकडा त्याला!”

आणि तो त्याच्या काकांच्या श्यामरावांच्या खोलीकडे धावला. वाघही त्याच्या मागून गेला.

रणजीतचा चुलत भाऊ व श्यामरावांचा मुलगा विश्वजीतही त्याच्या मागूनच खोलीत शिरला.

लाईटस् नसल्याने त्यांना काहीच अर्थ लागत नव्हता. विश्वजीतने श्यामरावांना आवाज दिला,

“बाबा... बाबा...!” त्याच्या आवाजातील भिती स्पष्ट जाणवत होती.

सगळेच जागीच होते. उजेड नसल्याने कोणी हालचाल करत नव्हते.

इकडे खाली, इतर सगळीकडे लाईटस् असून फक्त या घरात नाहीत हे लक्षात आल्याने नोकरांनीही लाईट मीटर चेक करवून फ्युज बदलून घेतली.

लाईटस् आले. वाघ, विश्वजीत व रणजीत श्यामरावांच्या खोलीत उभे होते. श्यामरावांची डेडबॉडी समोर पडलेली होती. हे भीषण दृष्य पाहून विश्वजीत रडू अनावर होवून रडू लागला. वाघने डेडबॉडीची पाहणी चालू केली. श्यामरावांच्या हातात एक पेंडंट अडलेले होते. वाघने ते ताब्यात घेतले. पाहणी केल्यावर वाघला समजले, की श्यामरावांचा घाव खोल नव्हता. तरीही श्यामराव मेले होते.

“काय झालंय?” रणजीतने अगदीच टेन्स्ड् चेहऱ्याने वाघला विचारले.

“लेडीज नेलकटर मधील छोटया सूरीने घाव केलाय. याने मृत्यू नाही होवू शकत.”

“असं अगदी तंतोतंत कसं सांगू शकतोस तू संम्राट?” रणजीतने पुन्हा विचारले.

“घाव बघून हे सहज लक्षात येतंय.” वाघने रणजीतकडे न बघताच घाव पाहत त्याला उत्तर दिले.

“मग?”

पण यावेळी रणजीतला त्याने काहीच इत्तर दिले नाही. तो खोलीत काही शोधाशोध करू लागला.

“बोल काही तरी संम्राट.” रणजीत इरिटेड होत म्हणाला.

वाघची नजर द्वारामागे पडली. तो तेथे गेला. तेथे एक प्लॅस्टिक डबी पडली होती. पाण्यासारखं काही तरी तेथे सांडलेही होते. वाघने ती हातात घेतली. वाघने बाटलीचा व त्या द्रव्याचा वास घेतला.

“कॉस्टिक सोडा!” तो उद्गारला.

“कॉस्टिक सोडा?” रणजीतचा प्रश्न.

“हो. याचा हवेशी संबंध आल्यावर त्यात मॉईश्चर तयार होते. जे खूपच विषारी असते. खून्याने ती सूरी कॉस्टिक सोडयाने बनलेल्या द्रव्यात बुडवली होती. त्या विषामुळे मृत्यू झालाय.” वाघने खुलासा केला.

मग वाघ विश्वजीतकडे गेला. त्याने त्याला स्वतःला सावरण्यास सांगितले. तो कसंबसं स्वतःला सावरतो रणजीतही त्याला सावरून धरत त्याला आधार दिला.

तेवढयात इतर नोकरही खोलीत आले. फ्युज दुरूस्त केलेल्या नोकराने फ्युज गेली असल्याचे सांगितले.

हे ऐकून वाघचे डोळे विस्फारले. तो धावतच किचनमध्ये गेला.

"काय झाले सम्राट?" रणजीतने त्याच्यामागून धावतच त्याला प्रश्न केला.

पण वाघने काहीच उत्तर दिले नाही. तो थेट डायनिंग मध्येच येवून थांबला.

इतर मंडळी त्याची गडबड पाहून उठून उभी राहिली. त्याने सगळयात आधी ज्युसरचा प्लग चेक केला.

"फाऊंड इट!" तो मोठयाने उद्‌गारला.

"काय झालंय श्यामला. बराय ना तो? विशू एवढा का रडतोय?" धनाजीरावांनी काळजीने रणजीतला विचारले.

रणजीतचा चेहराही दूःखी होता. पण त्याने वडलांना काहीच उत्तर दिले नाही.

"काय चाललंय तुझं जरा सांगशील का?" रणजीतने अजूनच अधीर होत वाघला प्रश्न केला..

पण त्याने रणजीतच्या प्रश्नाला उत्तर न देता नोकरांना प्रस्न केला,

"तुम्हाला ती पळालेली व्यक्ती सापडली?"

"नाही साहेब." विनोद नांवाच्या नोकराने उत्तर दिले.

वाघने स्मित केले.

"सापडणारही नव्हता. कारण खूनी घरातच आहे आणि ती आहे; ऋतुजा!" वाघ बोलला.

"काय? श्यामचा खून...!" घाबरलेले धनाजीराव फक्त एवढंच बोलू शकले.

"अरे देवा..."

धक्क्याने रणजीतच्या आई आनंदीबाई खाली खूर्चीवरच बसल्या.

“वेड लागलंय का? काय बोलतोयस काय तू? माझ्या वडलांच्या खूनाला तू माझ्याच सख्या बहिणीला दोषी ठरवतोयस! विसरू नको तू फक्त एक क्राईम फिक्शन राईटर आहेस. स्वतःला डिटेक्टिव्ह समजू नको!” इतका वेळ नुस्तं रडत असलेला विश्वजीत उसळून म्हणाला.

“मी जे लिहितो ते न अभ्यास करता नाही. हे तुम्हीही ध्यानात घ्या! मला माहितेय मी काय बोलतोय!” वाघला त्याने डिवचले होते. त्यामुळे तोही आवाजात कठोरता आणत म्हणाला.

ऋतुजाही घाबरली. वाघ काय म्हणतोय यावर कोणाचाच विश्वास बसत नव्हता. मुळात श्यामराव मेलेत यावरही कोणाचा विश्वास बसला नव्हता. त्यामुळे सगळचे गोठले होते.

“संम्राट, तुला कळतंय तू काय म्हणतोयंस?” रणजीतने थोडे शांत होत वाघला विचारले.

“होय हे खरं आहे.” आता वाघनेही तेवढयाच शांततेत उत्तर दिले,

“मघाशी आपण जेवण करत असताना ऋतुजाने ज्यूस बणवण्यासाठी ज्युसर चालू केला होता. म्हणून मी पहिल्यांदा ज्युसरच पाहिला. त्याच्या प्लगला तार गुंडाळली आहे. त्यामुळेच ज्युसर चालू केल्या - केल्या शॉर्ट सर्किट होवून फ्युज उडाली. अशी ट्रिक एक इलेक्ट्रिक इंजिनिअरच्याच डोक्यात येवू शकते. आणि ऋतुजा ही तुमच्या घरातील एकटीच आहे, जीने तुमच्या घरातील टेक्स्टाईल परंपरेला छेद देत इलेक्ट्रिक इंजिनियरींग निवडले आहे. होय ना? शिवाय ती सायन्स स्टूडन्ट असल्याने तिला कॉस्टिक सोड्याबद्दल संपूर्ण माहिती असणार हे उघडच आहे. पण ही केस इथेच संपत नाही. कारण खून झाला तेव्हा ऋतुजा इथेच आपल्या समोर होती. मग खून केला कुणी? तर खून केला आहे ऋतुजाच्या बॉयफ्रेन्डनी!”

“आता त्याचा काय संबंध? ऋतुजानं तर त्याला भेटणं कधीच बंद केलं आहे...” रणजीत जास्तच कंन्फ्युज्ड् झाला,

“काकांना त्या दोघांच्या प्रेमाला विरोध होता. त्यामुळे काकांच्या सांगण्यावरूनच तिने त्याच्याशी संबंध तोडले होते.”

तो ऋतुजाकडे वळला,

“ऋतुजा बोल ना तू काही तरी!” रणजीत मोठयाने ओरडला.

तशी ऋतुजा भानावर येत,

“हं... हो... हो... आमचा आता काही संबंध नाही...” एवढंच म्हणाली.

पण वाघला स्वतःवर पूर्ण विश्वास होता. त्याने खुलासा करायला सुरवात केली,

“ऋतुजा खोटं बोलतीय. लाईट गेल्यावर हिचा बॉयफ्रेंड मेन डोअरनेच तो आत आला. तुम्हाला आठवत असेल, तर आज बाहेरून आलेली शेवटची व्यक्ती ऋतुजानं होती. तिनं नोकराला सांगितलंही होतं, की मेडिकलमधून एक मुलगा औषधं घेवून येणार आहे म्हणून. तो तिचा बॉयफ्रेंडच होता.

मी डेडबॉडीची पाहणी केली, तेव्हा मला तिथे श्यामरावांच्या हातात एक पेंडंट मिळालं. तसंच जसं ऋतुजाच्या गळयात आहे. असं पेंडंट घरातील कोणत्याच व्यक्तीच्या गळयात नव्हतं. शिवाय त्या पेंडंटमध्ये बदामाचा आकार असून ऋतुजाच्या व तिच्या बॉयफ्रेंडच्या नांवाचं इनिशिअल्स् आहेत. यावरून हे सिद्धच होतंय!”

“पण खून लेडीज नेलकटरने झालाय असं तूच तर म्हणालास...” रणजीतने प्रश्न केला.

“तो मुलगा खूनासाठी लेडीज नेलकटर का घेऊन येईल?” रणजीतच्या वडिलांनी धनाजीरावांनीही या संभाषणात भाग घेतला.

सगळा प्रकार ऐकून ते खूपच अस्वस्थ झाले होते.

“सांगतो.” वाघने त्यांच्याकडे पाहिले व बोलू लागला,

“खून विषानंच करायचा हे ठरलं होतं. ते फक्त त्यांच्या रक्तात पोहोचवायचं होतं इतकंच. लेडीज नेलकटर असल्यानं संशय एका स्त्रीवरच येणार हा त्यामागील विचार असावा. त्याचं दूर्दैव हे, की जेव्हा त्याने तुमच्या भावावर वार केला, तेव्हा तुमच्या भावानी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. तो निसटला, पण त्या हातापाई त त्याचे पेंडंट व ती डबी तेथे पडली म्हणून हे लक्षात आलं. हवं असल्यास ऋतुजाच्या बॉयफ्रेंडच्या हाताचे ठसे या डबीवरील ठशांशी जुळवून पहावेत पोलिसांकडून.

आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल जाणून, की ते नेलकटरही ऋतुजाचंच आहे!”

त्याने ऋतुजाकडे पाहिले. ऋतुजा घाबरून खाली पाहू लागली. तिच्या डोळयातून पाणी घरंगळू लागले.

"आज ती तिच्या बॉयफ्रेंडलाच भेटायला गेली होती. नेलकटर बुडवून ठेवलेली कॉस्टिक सोड्याची डबी तिनेच त्याला दिली असणार अशी माझी पक्की खात्री आहे!"

एवढं बोलून त्याने स्वतःच पोलिसांना फोन लावून बोलवून घेतले.

पोलिस ऋतुजाला घेवून गेले.

तिचा बॉयफ्रेंड सचिनलाही त्याच्या घरून अटक करण्यात आली. त्याचे ठसे तपासले गेले. सचिन दोषी ठरला.

आता काहीच पर्याय नाही हे पाहून ऋतुजाने आणि सचिनने कबुली जबाब दिला.

तेव्हा समजले, की ऋतुजा व सचिनबद्दल श्यामरावांना समजले, तेव्हा श्यामरावांनी त्यांच्या नात्याला नकार दिला होता व सचिनला गुंडांकडून मारले होते. ऋतुजाला तिच्या वडिलांचे असे वागणे अजिबात पटलेले नव्हते. दोघांना एकमेकांशी भेटणेही बंद करवून टाकले होते त्यांनी. म्हणून या रागातून त्यांनी श्यामरावांना जीवे मारले होते. आणि काही दिवसांतच हे प्रकरण निवळल्यावर पळून जाण्याचा त्यांचा बेत होता, हे उघड झाले.

दोघांना कोठडीत टाकण्यात आले. रणजीत ऋतुजाला भेटला. त्यांच्या वैयक्तिक संभाषणात आपण भाग घेणे योग्य नाही हे लक्षात घेवून वाघ लांबच थांबला.

घरी परतताना,

"सॉरी रणजीत. मला गप बसायला हवं होतं... ॲम रिअली वेरी सॉरी..."

"तुमची काही चूक नाही मि. वाघ. ती माझी बहिण असली तरी माझ्या काकांची खूनी पण आहे... तुम्ही मनाला लावून घेवू नका..."

"ते काही असलं, तरी मी तुमच्या घरात असून तुमचे काका मारले गेले... यासाठी मी स्वतःला कधी माफ नाही करू शकणार. प्लीज मी तुम्हाला रिक्वेस्ट करतो, मला माझ्या घरी सोडा..."

"तुम्ही असं नाही जावू शकत मि. वाघ!" रणजीत घाबरा होत म्हणाला,

"काकांचं जे झालं ते झालं. त्याला आपण कोणीच काहीच करू शकत नाही. पण अजून माझ्यावरचा धोका टळला नाही. आपण अजून हल्लेखोराला पकडलेलं नाहीए..."

"मी या प्रकरणानं खूपच खचलोय. सॉरी मि. रणजीत, आय कान्ट हेल्प यू एनिमोर... प्लीज मला घरी सोडा..."

रणजीतचाही मग नाईलाज झाला दीर्घ श्वास टाकून तो बोलला,

"फाईन. ॲस यु विश."

आणि त्याने वाघला घरी सोडले...

## ७.  खरी ओळख

"सॉरी मी मध्येच बोलतोय... मला माहितेय तुमचं अजून सांगून झालेलं नाही... पण... पण एक प्रश्न होता..." संकोचत वाघला मी थांबवले.

त्याने मानेनेच खूण करून संमती दर्शवली.

"मी जेवढं तुम्हाला ओळखंय, तेवढयावरून माझ्या एवढं मात्र लक्षात आलंय, की जर कोणी गिल्टी असेल, तर तुम्ही त्याला जीवंत सोडत नाही. मग..."

माझा प्रश्न पूर्ण करण्याआधीच तो मोठयाने मनसोक्त हसला. ते बरेच झाले म्हणा. कारण प्रश्न पूर्ण करण्याची माझ्यातही हिंमत नव्हतीच.

त्याने उलट मलाच प्रश्न केला,

"तुझी कोणी गर्लफ्रेंड आहे?"

त्याच्या या प्रश्नाने मी अंतर्मुख झालो,

"गर्लफ्रेंड असं म्हणता येणार नाही, पण एक मुलगी आहे जिच्यावर मी प्रेम करतो..." मी खाली पाहत बोललो.

"मग?" त्याने विचारले.

"शी रिजेक्टेड मी..."

"आणि समज, असं असेल तर, की तिचं तुझ्यावर प्रेम आहे, पण तिची काही कारणं आहेत नाही म्हणण्याची. मग? म्हणजे तुमची जात, आर्थिक तफावत यामुळं तुमच्या नात्याला घरातून विरोध होईल या विचारानेही तिने नकार दिलेला असू शकतो..."

"तरी मी तिच्या निर्णयाचा सम्मानच करीन. तिला 'का' असं विचारणार नाही. मग तिची कारणं काहीही असोत." मी त्याचे वाक्य मध्येच तोडत म्हणालो.

त्याला पुढे आणखी काही तरी म्हणायचे होते, पण मला तो विषय टाळायचा होता म्हणून मी निर्वाणीचे बोललो,

"तिचं सुखी असणं माझ्यासाठी जास्त महत्त्वाचं आहे. तिला माझ्यासोबतच पुढंच आयुष्य सुखी असेल असं काहीही कारणानं वाटत नसेल तरी, ॲम फाईन विद दॅट!" मी खाली पहात असूनही माझे पाणावलेले डोळे त्याला दिसले.

त्याने माझ्या मांडीवर थोपटले. पण त्याच्या स्पर्शात सांत्वना नव्हती. प्रेम होते. मला ते जाणवले. वास्तविक तो कधी मला एकेरी संबोधायला लागला हे त्याच्याही लक्षात आले नव्हते आणि माझ्याही. या क्रूर चेहऱ्यामागे इतका हळवा आणि प्रेमळ माणूस दडलाय हे मला तेव्हा समजले.

त्यावेळी तिच्या आठवणीने, की याच्या प्रेमभऱ्या स्पर्शाने; ठाऊक नाही; पण माझ्या गालावरून अश्रू ओघळू लागले. मी वर त्याच्याकडे पाहिले. त्याचे डोळेही मला चमकताना दिसले. कदाचित त्याच्या डोळयांतही पाणी आले असणार. पण मी ठाम नाही सांगू शकत...

"खरंच. प्रेम ही भावना खूप मोठी आहे सूरज. इथं स्वार्थाला जागा नाही. विचार कर ना, सगळं जग जर एकमेकांशी प्रेमानं वागायला लागलं, तर ते किती सुंदर होईल. दुःख रहित होईल. नाही? पण माणूस खोटया माजापायी प्रेम व्यक्त करणंच विसरून जातो. स्वार्थापोटी गुन्हे करायला लागतो. आणि यातून या सगळयांना शिक्षा करण्यासाठी मग माझ्यासारख्या वाघला यावं लागतं...

तुला माहितेय, मी अनाथ आहे. आमच्याच घरात नवरा बायको असलेल्या नोकरांनी मी लहान असताना अगदी मला कळतही नव्हतं तेव्हा, माझ्या आई वडलांना ठार मारलं. घरातील सगळेच एकदम मेले तर त्यांच्यावर संशय जाईल म्हणून त्यांनी मला तेवढं जीवंत ठेवलं. लहान बाळ असणारा मी त्यांना नुकसान तरी काय पोहोचवणार होतो? म्हणून त्यांना माझ्यापासून काही धोका वाटला नव्हता.

आणि मग ते माझे संगोपनकर्ते म्हणून या घरात राहून आमच्या वडीलोपार्जित संपतीला भोगू लागले. मला कळायला लागलं तेव्हा पासून तेच मला माझे आई वडील वाटू लागले होते. मला माझ्या खऱ्या आई वडलांबद्दल काहीच माहिती नव्हतं.

मी एकवीस वर्षांचा झाल्यावर मला समजले, की वडलांनी त्यांचे वील ते तरूण असतानाच बनवून घेतले होते. कारण ते ॲन्टीक डिलर असल्याने त्यांच्या जीवाला कायम धोका असायचा. त्यांत त्यांची व वडिलोपार्जित सारी संपत्ती माझ्या नांवावर केली होती. आणि ती वील वकीलाकडे असल्यानेही माझ्या खोटया आई वडलांनी मला जीवंत ठेवले होते.

मी वयात आल्यावर ते मला सगळी संपत्ती त्यांच्या नांवावर करण्यासाठी जबरदस्ती करू लागले. माझे हालहाल केले. खोलीत बंद ठेवले महिनोंमहिने. मला

उपाशीही ठेवायला कमी केले नाही. मग एक दिवस मी पक्का निर्धार केला आणि त्यांना संपवलं... तेथून जन्मला, हा विजय वाघ!"

त्याच्या बंदूकीतून गोळया सुटाव्या तशा तो अतिशय गतीने बोलत होता. त्याची उद्विग्नता स्पष्ट जाणवत होती... वाघला मी पहिल्यांदा असं बघत होतो...

(त्याने घातलेला नियम मोडून मी हे सांगितले, कारण तुम्ही त्याला गुन्हेगार समजू नये म्हणून... वास्तविक त्याचा हा इतिहास कोणालाच माहित नाही. म्हणून मी हे सांगण्याचे धाडस करू शकतो. त्याच्या माहितीवरून त्याची ओळख लोकांसमोर येणार नाही याची मला खात्री आहे म्हणून...)

आपल्या आवेगाला आवर घालत तो पुढे एवढंच बोलला,

"खरं तर, जर मला प्रेम मिळालं असतं ना, तर हा विजय वाघ तयारच झाला नसता..."

काही वेळ असाच शांत केला. काय बोलावे मला सुचत नव्हते. मी किती चुकीचा विचार करत होतो याच्याबद्दल... हा गुन्हेगार नाही. हा तर समाजातली घाण साफ करतोय...

"मग तिच्या नकारावर तुझं काय म्हणणं होतं?" त्यानेच शांतता तोडत मला विचारले.

"जसं तिला निवडणं हा माझा निर्णय होता, तसं तिचा जोडीदार निवडण्याचा तिलाही पूर्ण अधिकार आहे. मी तिला फोर्स नाही करू शकत... आणि करणारही नाही."

माझे उत्तर ऐकून त्याने मनमोकळे स्मित केले. म्हणाला,

"तुला प्रेम म्हणजे काय ते समजलंय त्यामुळं मी ऋतुजाला आणि तिचा बॉयफ्रेंड सचिनला का नाही मारलं हे तू समजू शकशील. असं बघ, त्यांनी जरी खून केला असला तरी त्यांनी हे एकमेकांच्या प्रेमापोटी केलं. त्यांना वाटलं, श्यामराव त्यांच्या नात्यातील काटा आहेत. म्हणून एकत्र येण्यासाठी त्यानी तो काटाच दूर केला. हा... त्यांचा मार्ग चूकला. त्यांनी श्यामरावांना कंविन्स् करायला हवं होतं. त्यांना समजायला, समजून घ्यायला वेळ द्यायला हवा होता.

प्रेम ही भावना खूप उदात्त आहे. प्रेम हे माणसाला नम्र, सोशीक बणवते. पण ते यांच्या बाबतीत झाले नाही. तू तुझ्या आयुष्यात जो समजूतदारपणा दाखवलास तसा त्यांना दाखवता आला नाही आणि ते गुन्हेगार बनले. त्यांच्या हातून गुन्हा घडला. पण ते प्रेमी असल्यानं मी त्यांना नाही मारलं, पण त्यांना शिक्षा तर

व्हायला हवी होती. म्हणून मी त्यांना पोलिसांच्या स्वाधीन केलं. त्याच्या करणीची त्यांना सिक्षा व्हावी म्हणून!”

“मग पुढं? तुम्ही खरंच ती केस सोडलीत? काय झाले पुढं?” माझा प्रश्न ऐकून त्याने त्याची अर्धी राहिलेली कहाणी पुर्ण केली...

## ८.	विश्वजीतचा ॲक्सिडेंट

दूसऱ्या दिवशी, घाबरलेला रणजीत पुन्हा वाघकडे आला. तो थरथरत होता. तो वाघला पुन्हा त्याच्या घरी येण्यासाठी मनवू लागला,

“असं करू नका मि. वाघ. मी काल तुम्हाला घरी सोडलं, पण काळजीनं रात्रभर झोपू शकलो नाही...”

“बरोबर आहे तुमचं. पण खरंच आय कान्ट हेल्प इट.” वाघने पुन्हा त्यांना स्पष्ट केले.

तोच रणजीतला फोन आला. फोनवर त्याचा भाऊ विश्वजीत ॲक्सीडेंटमध्ये मेल्याची बातमी त्याला समजली.

“मि. वाघ; माझा भाऊ...” तो घाबरून एवढेच बोलू शकला.

तसा वाघ तडक उठला. रणजीत व तो ताबडतोब ॲक्सिडेंटच्या जागी पोहोचले.

रणजीतच्या घरापासून जवळच ते ठिकाण होते. घरातील सर्वच जण तेथे जमलेले होते. गाडी ॲक्सिडेंट होवून पूर्ण जळून गेलेली होती. वाघ गाडीची पाहणी करू लागला.

“हा खून आहे!” गाडी बघतच तो जवळ असलेल्या रणजीतला म्हणाला.

“बट हाऊ?”

“विश्वजीतची जळलेली बॉडी बघा. डोक्यात लोखंडी वस्तू घालून आधी यांना कुणीतरी ठार मारलं आहे. मग यांना गाडीत बसवलं आहे.”

“पण मग गाडी उडाली कशी?” रणजीत चक्रावून गेला.

“हिटरमुळे. हिटर चालू करून त्यावर ब्लॅन्केट झाकलं गेलं. यामुळे मोठया प्रमाणात हिट प्रोडयुस झाली. गाडीचे गॅसकिट लिकेज केले गेले असणार हे नक्की. म्हणूनच हिट प्रोडयुस झाल्याने कार बर्स्ट झाली. तुम्हाला जळलेल्या ब्लॅन्केटचे तुकडे दिसतील कारमध्ये.”

असे म्हणतच त्याने कारचे गॅसकिट पाहिले. त्याच्या चिंधड्या झाल्या होत्या.

“तसंच झालंय.”

“म्हणूनच म्हणतोय तुम्ही इथेच रहा...” रणजीत घाबऱ्या स्वरात वाघच्या कानात म्हणाला.

“ठिक आहे. पण या प्रकरणाची पोलिस कंप्लेट करायची?” वाघने त्याच्या घरी परत जाण्याची तयारी दर्शवली व त्याला प्रश्न केला.

“खूनी सापडण्याचे चान्सेस् किती आहेत?” रणजीतचा प्रतिप्रश्न.

“अबाऊट झीरो. खून कसा झाला हे सिद्ध करता येतंय, पण कोणी केला हे नाही.” वाघने आपले मत बोलून दाखवले.

“मग राहू द्या. तसंही कंप्लेट करून माझा भाऊ काही परत येणार नाही. उगाच आईला आणि पप्पांना मनस्तापच होईल. हा ॲक्सिडेंटच आहे असंच त्यांना वाटत राहू दे.” रणजीतने निर्णय बोलून दाखवला.

विश्वजीतचे अंत्यसंस्कार करण्यात आले.

रात्री गायकवाडाच्या घरात; रणजीत व वाघ रणजीतच्या खोलीत बसले असताना धनाजीराव आले,

“संम्राट, मला घरात तमाशा नकोय. म्हणून शांतपणे सांगतोय, या घरातून निघून जा.”

“पप्पा प्लीज, हा माझा मित्र आहे. तुम्ही असं त्याला जायला नाही सांगू शकत.” रणजीतने ठामपणे बोलून दाखवले.

तसा शांतपणे बोलत असलेल्या धनाजीरावांचा पारा चढला,

“तुझा हा मित्र घरात आल्यापासून घराला नाट लागलाय. ते काही नाही. याला जावंच लागेल!” धनाजीरावांनी रणजीत पेक्षाही ठामपणे आपला निर्णय ऐकवला.

“आधी सांगितले नाही. पण आता मला सांगणं भाग आहे. मी संम्राट नाही. मी विजय वाघ. एक प्रायव्हेट डिटेक्टिव्ह आहे. सो प्लीज मला येथे राहून माझं काम करू द्या.”

सकाळी रणजीत कामानिमित्त ड्राईव्हरच्या कॉटेजमध्ये गेल्यावर त्याला त्याचा ड्राईव्हर मेलेला आढळून आला. तो खूपच घाबरला आणि त्याने वाघला तेथे बोलवून घेतले.

“पाहिलंत. आता तर माझा ड्रायव्हरही...”

वाघ पाहणी करू लागतो.

“काळजी करू नका. हा खून नाही. दारूच्या ओव्हर डोसमुळे मेलाय.”

“पण ओव्हर डोसमूळे हा कसा काय मरू शकतो?” रणजीतने प्रश्न केला.

“विषारी बनावटी दारूचं मार्केट सध्या जोरात चालू आहे आपल्याकडं. तसलीच दारू याच्या हाती लागली असेल... यू डोन्ट वरी.” वाघने रणजीतला आश्वस्त केलं.

# ९.   धनाजीराव व आनंदीबाई

आता घरात मुख्य सदस्य राहिले तीनच. रणजीत व त्याचे आई वडील.

रात्री, सर्वांची जेवणे झाली. रणजीतने त्याच्या आई आनंदीबाईंना औषधे दिली.

“घरातील परिस्थितीने तुला खूपच काळजीत पाडलेलं दिसतंय बाळा... पण चांगलंय, या कारणाने का होईना, तुझ्यात बदल होतोय...” आनंदीबाई म्हणाल्या.

“तुला माहितेय आई. मला कायमच तुमची काळजी वाटते.”

“होय रे बाळ.”

आणि त्यांनी शेवटची गोळी रणजीत कडून घेतली.

“अरे ही कुठली गोळी?”

“नवीन आहे. डोक्टरांनी गोळया बदलून दिल्या आहेत.”

आनंदीबाईनी औषधे घेतली.

“बरं चल. खोलीत चल.” त्याने आपल्या आईला खोलीत झोपवले.

धनाजीरावही त्यांच्यासोबत खोलीत निघून गेले.

रणजीत परत बाहेर आला. वाघजवळ हताश बसला.

“असं दिसतं की तुमचं तुमच्या आईवर खूप प्रेम आहे.” वाघने त्याला विचारले.

“हो. पण फक्त आईच नाही, तर माझं घरातील सर्वांवरच प्रेम आहे. पण माझं दूर्दैव... घरात काय काय घडतंय हे पाहताय तुम्ही. एक एक करून सर्व ...” रणजीतच्या डोळयांत पाणी उभा राहिले.

“सॉरी रणजीत. पण माझेही प्रयत्न तर चालूच आहेत.”

“मला तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. आता तुम्ही रेस्ट घ्या. सकाळी भेटू. गूड नाईट.”

"गूड नाईट."

सर्व झोपल्यावर मध्यरात्री; धनजीरावांच्या खोलीतून रणजीतच्या ओरडल्याचा आवाज आला. वाघ त्यांच्या खोलीकडे पळाला. रात्रभर त्याला झोप नव्हतीच कसली.

त्यांने पाहिले तर रणजीत त्यांच्या खोलीतच उभा होता. रडत होता. समोरच्या बेडवर धनंजयराव पडलेले होते. आनंदीबाई तेथेच झोपलेल्या होत्या.

"पप्पांना पाणी हवंय का बघायला आलो तर..." रणजीत रडत म्हणाला.

"रणजीत; मी खरेच हरलो. मी असताना तुमच्या घरी खून झालेत. आय ॲम सॉरी! मी आता इथे नाही राहू शकत. तसेही आता तुमच्या जीवाला काही धोका नाही. कारण तुमच्या अजोबांच्या वीलला चॅलेंज करणारे आता कोणी जीवंतच नाहीए. सो, येतो मी. टेक केअर. बाय!"

"पण ज्याअर्थी एकएक करून सगळे मरताहेत त्याअर्थी कोणी तरी खूनी असणारच ना..."

"काळजी करू नका. कोणीच आता तुम्हाला काही करणार नाही. मी खात्री देतो. मी बदोबस्त केलाय तसा. पण सॉरी मी तुमच्या फॅमिलीला नाही वाचवू शकलो. येतो मी."

आणि वाघ घरी निघून आला.

# १०. बेरेट्टा

पंधरा दिवसांनंतर -

रणजीत वाघला भेटायला आला,

"मि. वाघ, मला माहितेय तुम्ही हरलेल्या केसचे पैसे नाही घेणार, पण मला तुम्हाला तुमची फी देण्याची इच्छा आहे."

तो पैशांचे बंडल समोर टी-पॉयवर ठेवतो.

"संपत्तीचा ताबा तुम्हाला मिळाला तर!" वाघ स्मित करत म्हणाला.

"हो. पण याचा आता उपयोग काय?" रणजीत नाराजीने म्हणाला.

"मग बहिणीला कधी सोडवणार आहात?" बॉम्ब फुटावा तस्सा वाघने अचानक रणजीतला प्रश्न केला.

रणजीत चपापला,

"मी तिला का सोडवू? ती गुन्हेगार आहे!"

"पण तुम्ही तर तिला वचन दिलयं, की प्रॉपर्टीचा ताबा तुमच्याकडे आल्यावर तुम्ही तिला व तिच्या बॉयफ्रेंडला सोडवाल आणि त्यांचं लग्न पण लावून द्याल म्हणून. नाही का?!" वाघचा रणजीतवर आणखी एक बॉम्ब.

"ओह! तर तुम्ही ऐकलंयत तर सगळं..." रणजीतने थोडे रिलॅक्स होत मागे टेकत विचारले.

"अंहं! ऐकलं नाही. तुमच्या लिप मुवमेंटवरून समजलं. आणखी एक, ज्या दिवशी तुमचे वडील गेले, त्याच रात्री तुमची आई देखील गेली. हो ना?"

"हो. पण तुम्हाला कसं कळलं?" तो चपापून पुढं होत म्हणाला.

"तुच तर डिनर नंतर तुझ्या आईला औषधासोबत झोपेची गोळी दिलीस!" वाघ शांतपणे मंदस्मित करत म्हणाला.

तसा रणजीतच्या चेहऱ्यावरचा भाव बदला. तो आता क्रूर दिसू लागला.

"म्हणजे तुम्हाला माहितेय तर सगळं!"

"हो. घरातील सर्वांचाच खून तुच केलायस हे मला माहिती आहे!"

"मग तुम्ही कोणाला वाचवले का नाही माझ्यापासून!" रणजीत जरा गोंधळला.

"त्यांना वाचून काही उपयोग नव्हता. कारण तू कधी ना कधी सर्वांना मारलेच असतेस!" वाघ नेहमीच्या थंडपणे बोलला.

"माझ्यापेक्षा क्रूर तर तुम्ही आहात!"

"इफ यू से सो!"

*(इतकं कूल उत्तर होतं त्याचं रणजीतला. मला हे सगळं समजलं तेव्हा माझा भ्रम तुटला आणि मी वाघ संदर्भात पुन्हा कंन्फ्युज झालो. मला वाटत होतं, मी समजायला लागलोय याला. पण नाही...*

*मी त्याला याच्याबद्दल विचारले तेव्हा त्याचे मला उत्तर होते,*

*"एक दिवस प्रत्येकाला मरायचंच आहे. मग मी त्यांना वाचवून काय फायदा होता. लोकसंख्या आणि संसाधनाची खपत तेवढीच कमी झाली." आणि तो हसला.*

*माझ्या चेहऱ्यावरील भाव पाहून त्याला जास्त हसू आलं होतं.)*

कहाणीत पुढे तो रणजीतला म्हणाला,

काही दिवसांपूर्वी तू तुझ्या कुटूंबाचा इतिहास मला सांगितला होतास. आता मी तुला खरा इतिहास सांगतो. तुझ्या आजोबांनी त्यांच्या वीलमध्ये त्यांची प्रॉपर्टी सर्व कुटूंबियांमध्ये समसमान वाटली होती. फक्त तुला त्यांनी काही दिलं नव्हतं. कारण तू व्यसनी आहेस हे त्यांना समजलं होतं. दारू, सिगरेट, ड्रग्स, जुगार अशी सगळी व्यसन तू करतोस. तुझ्या बाबांमध्ये आणि आजोबांमध्ये पत्र व्यवहार चालू होता. तुझ्या बाबांची रूम चेक केली तेव्हा माझ्या हे लक्षात आलं. तिथं मला त्यांची पत्रं मिळाली. तुझ्या बाबांकडून तुझ्या अजोबांना तुझ्या व्यसनांबद्दल समजलं होतं. ही गोष्ट तुला समजली आणि वकिलाला धमकावून तू अजोबांचं खोटं मृत्यूपत्र बनवून घेतलंस. जे तू मला सांगितलंस. मला दाखवलेलं पत्रही खोटं होतं. हे मला ओळखायला वेळ लागला नाही. कारण कागद अगदीच नवीन होता. शिवाय पोस्टकार्डवर मागच्या वर्षी रिलीज झालेलं तिकीट चिकटवलं गेलं होतं. तू पत्र मात्र

वाराणसीवरून पाठवलंस. एवढी चलाकी तर तू नक्कीच दाखवलीस, पण तिकीटाचा घोळ तुझ्या लक्षात आला नाही.

मला तेव्हाच तुझ्यावर संशय आला होता, जेव्हा तू मला पहिल्यांदा भेटायला आला होतास आणि मला तुझ्यावर दोनदा हल्ला झाल्याचं सांगितलं होतंस. पण हल्ल्याची कोणतीच खूण तुझ्या शरीरावर नव्हती. म्हणूनच परिस्थितीचा अंदाज घेण्यासाठी मला तुझ्या घरी येणं भाग होतं.

तुझ्या घरातील प्रत्येकावर माझं बारीक लक्ष होतं. परिस्थिती खूपच गंभीर असल्याचं माझ्या लक्षात आलं. तुझ्या तावडीतून कूणीच वाचू शकणार नव्हतं. कारण गुन्हा घडण्यापूर्वी तुला अटक करवणं शक्यच नव्हतं. जर गुन्हा घडलाच नसता तर, तुला शिक्षा कशाची झाली असती? आणि महत्त्वाचं म्हणजे, जेव्हा - जेव्हा खून झाले, तेव्हा - तेव्हा तू माझ्यासोबतच होतास. एक डिटेक्टिव्ह सोबत असणं, इटस् ए परफेक्ट एलिबाय! नो?! स्मार्ट मूव! बट नॉट सो स्मार्ट! कॉस यू हायर्ड मी!" वाघने नजर बारीक करून स्मित करत रणजीतकडे पाहिले.

"ओह रिअली?" रणजीत गूर्मीत उद्गारला.

"याह! पहिल्यापासून घटनाक्रम पाहू! तू हल्ला झाल्याचं सांगितलंस, पण हल्ल्याची कोणतीच खूण शरीरावर नाही. जे पत्र दाखवलंस, ते तुच वाराणसीला जावून इथं पाठवलंस. मला घरी नेलंस. थोडे दिवस असंच जावू देणं तुला भाग होतं. कारण गेल्या गेल्या जर घरात काही घडल असतं, तर मी पहिला तुझ्यावरच संशय घेतला असता. पुढं तुझ्या काकांचा खून झाला. जो तू तुझ्या बहिणीकडूनच करवून घेतलास. तिच्या बॉयफ्रेंडला मी पकडलं असतं. पण तुला तसं होवू द्यायचं नव्हतं त्यावेळेला. कारण तसं झालं असतं, तर तुझ्या बहिणीचा तुझ्यावरचा विश्वास उडाला असता आणि तिनं चिडून संपत्तीवरचा हक्क सोडला नसता. म्हणून तिच्या बॉयफ्रेंडला न पकडणंच तुझ्यासाठी श्रेयस्कर होतं. म्हणून तू नोकरांना त्याच्या मागे पाठवलास. नोकर त्याला पकडू शकले नाहीत, कारण ऋतुजाने त्याला तेथून सुरक्षित निसटून जाण्याचा मार्ग आधीच दाखवला असणार.

आता प्रश्न असा, की हा खून सगळे घरात असतानाच तू का घडवून आणलास? तर ते यासाठी की तुला तुझ्या बहिणीला यात अडकवायचे होते. ऋतुजाने व सचिनने हे रात्री सगळी झोपल्यावर किंवा बाहेर कुठं तरी केलं असतं, तर त्यांना दोषी ठरवणं कठीण जाईल असं तुला वाटलं.

यूव् ऑलवेज अन्डरेस्टिमेटेड् मी ब्रदर! त्यांनी कुठंही आणि कसंही हे काम केलं असतं तरी मी त्यांना खूनी साबित केलंच असतं. असो. पुढं जावू...

काका मेले. बहिण आत गेली. दोन वारसदार कमी झाले. इथं तू माझा वापर करून घेतलास असं तुला वाटलं. बहिणीला तिच्या प्रियकराबरोबर लग्न लावून देतो असं सांगून तिला वारसा हक्क सोडायला लावलास. तिनं तसं केलंही. आणि आता तर काय; ती कुठली बाहेर येतीए?

केस सोडून परतणं ही माझी स्ट्रॅटजी होती. पण हे तुझ्या लक्षात आलं नाही. नंतर तू तुझ्या भावाला मारलंस व माझ्याकडं आलास. कारण त्याच्या मरणावेळी तू माझ्यासोबत होतास असं तू सांगू शकला असतास. सर्वांना वाटलं विश्वजीत कार ॲक्सिडेंट मध्ये गेला. पण जरी तो खून आहे हे सिद्ध झालं असतं तरी कोणी किंवा मीही तुझ्यावर संशय घेणार नाही असं तुला वाटलं.

तू माझ्याकडे आला होतास तेव्हा तुझं अंग थरथरत होतं पण ते भितीनं नाही, तर खूप दिवस दारू न पिल्यानं थरथरत होतं. तुझ्या मनात असलेल्या घालमेलीला तुझं शरीर प्रतिक्रिया देतं होतं. मला खात्री आहे, की भावाचा खून करण्यासाठी तू दूसऱ्या कोणाची तरी मदत नक्की घेतली असणार. कारण त्याला मारून गाडीत ठेवणं व ॲक्सिडेंटचा सेटअप करणं हे कोणा एकटयाचं काम नाही. आणि तू कोणाची मदत घेतलीस हेही मी सांगतो.

तू खून करण्यासाठी तुझ्या ड्राईव्हरचा उपयोग करून घेतलास. तुझ्या ड्रायव्हरनं रात्रीच गाडी ॲक्सिडेंटच्या जागी नेवून झाडावर आदळली. गॅसकीट लिकेज केलं व हिटर चालू करून त्यावर ब्लॅंकेट टाकून तो घरी परतला. इकडं भावाच्या खोलीत भाऊ झोपेत असताना तो ओरडू नये म्हणून तू आधी त्याला झोपेतच क्लोरोफॉम हुंगवलास आणि तू त्याच्या डोक्यात जाड लोखंडी वस्तू घालून त्याला ठार केलंस.

मी क्लोरोफॉमची बाटली पहिल्याच दिवशी तुझ्या खोलीत पाहिली होती. तो तू नशेसाठी वापरत होतास. कारण माझ्यासमोर तू ड्रग्स् किंवा दारूचं व्यसन करू शकत नव्हतास. भावाला मारून पहाटे तू व तुझ्या ड्राईव्हरनं त्याला नेवून गाडीत टाकलं व त्याचा पाय एक्सलेरेटरवर ठेवला. ॲक्सिडेंटचा फोन आल्यावर आपण घटनास्थळी पोहोचलो, तेव्हा घरातील नोकरांसकट सगळे तेथे हजर होते, पण तुझा ड्राईव्हर नव्हता.

म्हणून मी त्याच्या कॉटेजवर जावून त्याला गाठलं. त्याच्याकडून माहिती काढून घेवून मीच त्याला विषारी दारूची बाटली बक्षीस म्हणून दिली.

पळून जाण्याच्या बेतात होता तो बेटा. पण जाण्यापूर्वी दारूचा आस्वाद घेण्याचा मोह टाळू शकला नाही. पिला आणि मेला!

हं. बिचारा एकटाच होता. म्हणून मी त्याला या मोहमायेच्या जगातूनच मुक्त केलं.

रात्री तू स्वतः आईला औषधं दिलीस. या आधी तुला आईला स्वतःहून औषध देताना मी कधीच पाहिलं नव्हतं. तुझ्या कृत्याचं तुझ्या आईलाही आश्चर्य वाटलं होतं. आठवतंय?! त्या औषधांमध्ये झोपेचीही गोळी होती. डॉक्टरांनी औषधं बदलून दिली असल्याचं सांगून तू तिला ती गोळी खायला भाग पाडलंस. मी ज्यावेळी तुझ्या बाबांची खोली पाहिली होती, तेव्हा मी तुझ्या आईची औषधंही पाहिली होती. त्यात झोपेच्या गोळया नव्हत्या. त्यांच्या रिपोटर्समध्येही त्यांना स्लीप डिप्रिव्हेशनचा त्रास असल्याचं मला आढळलं नाही. इव्हन द्रो शी वॉज ए डायबिटीक पेशंट.

तुझ्या वडलांनाही तूच ठार मारलंस. मी खोलीत आलो होतो, तेव्हा मला तेथे हिट जाणवली होती. जी तुच वाढवली होतीस; ए. सी. चं टेम्प्रेचर वाढवून. तुझ्या वडलांना ब्लड प्रेशरचा त्रास असल्याने, त्या हिटचा त्यांना त्रास झाला आणि त्यांचे ब्लड प्रेशर वाढून ब्रेन हॅमेज होवून ते मरण पावले.

मी खोलीत येण्या आधी ए. सी. चं टेम्प्रेचर तू कमी केलेस खरं, पण रूम टेम्प्रेचर अजूनही नोर्मल झाले नव्हते. म्हणून मला संशय आला आणि मी त्यांची बॉडी चेक केली. त्यामुळे माझ्या ही गोष्ट लक्षात आली. एवढया सगळया गोंधळातही तुझ्या आई जाग्या झाल्या नाहीत. तू ओरडलास, तरीही नाही आणि खोलीचे टेम्प्रेचर वाढवूनही नाही. यावरूनच त्या गेल्याचं माझ्या लक्षात आलं. गोळी नक्कीच खूप जास्त एमजीची असणार. हो ना?!

आणि चला, आपण असं मानू, की त्यावेळी त्या मेल्या नसतीलही कदाचित. कारण एका गोळीनं कोणी मरणं शक्य नाही. पण त्या गाढ झोपेत तरी नक्कीच असणार. नंतर तू त्यांना मारलं असणार! नाही?”

“सेकेन्डवालं बरोबर आहे.” रणजीत शांतपणे मिस्त करत म्हणाला.

तो इतका कूलली बोलला, की आपण आपल्याच आईला मारलंय आणि याविषयीच बोलतोय याचे त्याला काहीच वाटत नाही हे वाघला स्पष्ट जाणवले.

“थॅन्क्स!” वाघही हसून म्हणाला.

“ब्रावो! ब्रावो! रिअली माईन्ड ब्लोव्हीन्ग! यु आर समथिंग मि. वाघ! मीच तुम्हाला समजून घेण्यात चुकलो. पण अति बुद्धीमान असणंही तब्येतीसाठी घातक असतं! नाही? आणि तसंही तुम्ही जी थिअरी मांडलीत, ती तुम्ही प्रूव्ह; नाही करू शकत. हं! आणि मी तुम्हाला इथं जर ठार मारलं; तर अजिबातच नाही!!!

रणजीतने गन बाहेर काढली. तोच आपल्या सर्वांत आवडत्या '.३२ लेन्ग कोल्ट' ने वाघने त्याच्या हातावर फायर केले.

(ही वाघची ही मोस्ट फेव्हरेट गन आहे. यू. एस्. मेड. १८७३ मध्ये. त्याने सगळयांत शेवटी ती गन मला दाखवली. आजच्या सेमी ऑटोमॅटिक व ऑटोमॅटिक गन्स्च्या जमान्यात ही गन खूपच रिस्की आहे. पण वाघला म्हणूनच तर ही गन आवडते. शिवाय ही महाग असून अन्टीक्स्च्या बाजारात या गनला खूप डिमान्ड आहे.)

वाघने फायर केल्यावर रणजीतची गन खाली पडली. तो भितीने पळू लागला. त्याचक्षणी दरवाज्यापाशी त्याचे अजोबा वीरसिंह त्याच्या समोर येवून उभे राहिले.

"कुठे चाललास बाळ?" वीरसिंहांच्या चेहऱ्यावर अतीव शांतता होती.

रणजीत प्राणांतिक घाबरला,

"तु... तुम्ही?... इथं...?"

"मीच पत्र पाठवून बोलवलंय त्यांना!" वाघ शांतपणे म्हणाला.

रणजीतने मागे वाघकडे वळून पाहिले. रणजीत अतिशय रागावलेला होता. चिडून त्याने वाघवर हल्ला केला. वाघची गन खाली पडली. दोघांत हातापाई झाली.

शेवटी वाघनेच रणजीतवर मात केली. रणजीत खाली पडला. त्याचवेळी त्याने खाली पडलेली वाघची गन उचलली व वीरसिंहना जवळ ओढून त्याच्या कनपट्टीवरच त्याने रोखली.

"मला जावू दे! नाही तर!" रणजीत ओरडला.

वाघने पण तातडीने रणजीतची खाली पडलेली गन उचलली व फायर केलं. गोळी रणजीतच्या दोन्ही भुवयांच्या मधे लागली. रणजीतच्या हातातील वाघच्या गन मधूनही फायर झाले. पण गोळी वीरसिंहना न लागता भिंतीवर आदळली.

"केस क्लोज्ड्!!!" वाघ ओरडला.

त्याच्या चेहऱ्यावर संताप स्पष्ट दिसत होता. पण त्याचवेळी त्याच्या चहऱ्यावरील भाव अचानक बदलले आणि स्मिताची एक लकेर त्याच्या ओठांवर उमटली. जणू त्याला आपण समोर एक माणूस मारलाय याचे त्याला काही पडलेले नाही. तो नेहमीच्या त्याच्या स्वभावानुसार म्हणाला,

"साला ही पण गन भारी आहे! बेरेट्टा!!!"

समाप्त!

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.”

– Oliver Wendell Holmes


www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.